सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक - ०८/२०२४-२०२५

सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना सर्वसाधारण सभेची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **शुक्रवार दि.२०/०९/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता महानगरपालिका मुख्यालय येथील कै.राजाभाऊ हरिभाऊ जगदाळे सभागृह, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.०९/०९/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. महानगरपालिका क्षेत्रातील श्री.सरस्वती सहकारी भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित,सांगली या संस्थेच्या सि.स.नं.५४८६ व स.नं.२५४/२ या मनपा ओपन स्पेसला शहिद राजगुरु विरंगुळा केंद्र असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

३. महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील शामरावनगर कडून उत्तर बाजूने बाहेर येणारा रोड व गंजीखान्याकडून दक्षिणेस बाहेर येणाऱ्या चौकाला आरक्षणाचे जनक छत्रपती राजे राजर्षी शाहू महाराज चौक असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

४. महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील व्यंकटेश सृष्टी बायपास रोड अथर्व लक्झरीया या शेजारील परिसरास श्री.छत्रपती शिवाजी महाराज कॉलनी असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

५. महानगरपालिकेच्या वतीने वडार कॉलनी प्रभाग क्र.१० सांगली येथे बांधण्यात येत असलेल्या वडार भवन या इमारतीस स्वर्गीय अमरदादा निंबाळकर भवन असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

६. महानगरपालिका क्षेत्रातील उत्कष हडको कॉलनी स.नं.२५२ नविन स.नं.१९/१ या मनपा ओपन स्पेसला उत्कर्ष बालोद्यान असे नामकरण करणेकामी नामकरणाचा प्राथमिक इरादा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

७. महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.९ स.नं.६३५४/२४५ व ६३५४/२४६ या मनपा ओपन स्पेसला आमदार सुधीर दादा गाडगीळ क्रिडा प्रबोधिनी असे नामकरण करणेकामी नामकरणाचा प्राथमिक इरादा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

८. सन २०२३-२४ महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात मंजुर एकुण र.रु.१५,००,००,०००/- मात्रच्या प्रस्तावातील काम क्र.५४ , प्रभाग क्र.८ मधील जिजामाता हौसिंग सोसायटी येथील ८० फुटी रोड ते चैत्रबन नाल्यापर्यत रस्ता करणे र.रु.६० लक्ष मात्रच्या कामाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजुरीस्तव सादर करणेस मान्यता देणेकामी **अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

९. महानगरपालिका क्षेत्रातील विश्रामबाग पोलीस हेडक्वॉर्टर्स व सह्याद्रीनगर भागाकरीता पाणी पुरवठासाठी स्वतंत्र असलेली जूनी कालबाह्य झालेली पी.व्ही.सी.लाईन बदलून यशवंतनगर टाकी ते चैत्रबन चौक लगत हेड क्वॉर्टर्स पाणी योजना संप (साठवण हौद) पर्यत नविन ग्रॅव्हीटी मेन पाईप लाईन टाकणे कामाचा खर्च १५ वित्त आयोगाच्या अनुदानातून करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त मुख्यालय (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

१०. चालू आर्थिक वर्षात नविन आकारणी होणाऱ्या मालमत्तांच्या बाबतीत मालमत्ताधारकाने सदर देयक एक रकमी भरल्यास मालमत्ताधारकांना सामान्य करात ५% सवलत देणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता कर व इतर) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

११. प्रभावीपणे वसुल होण्याकरीता घरपट्टी देयकामध्ये सवलत देणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता कर व इतर) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

१२. सांगली सि.स.नं.१४१९ व१३९६ या मिळकतीच्या मध्ये असणाऱ्या रेखांकनातील अंतर्गत रस्त्यावर श्री.शामसुंदर तोष्णीवाल यांनी उभया केलेल्या गार्डनबाबत प्रापत हरमतीची सुनावणी अंती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०३ (२) मधील तरतुदीनुसार रस्त्यांतर्गत असलेले ३० फुट X ७० फुट (२१००.०० चौ.फुट) क्षेत्र सार्वजनिक रस्ता असणे बदं करणेस आवयश्यक ती यथोचित कार्यवाही महापालिकेकडून करण्यास मान्यता देणेकामी **उपायुक्त मुख्यालय (नगररचना विभाग,सांगली) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

१३. राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा सन २०२४-२५ या वर्षात सहभागी होणेस प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (कर व इतर) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

१४. सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका व रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आमराई येथे २००KLD क्षमतेचा मलनि:सारण प्रकल्प उभारणेकामी मुदतवाढ व जागा बदलणेस व त्याकामी येणारे र.रु.२४ लक्ष मात्रच्या खर्चास मान्यता देणेकामी **अतिरिक्त आयुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

१५. ५% मागासवर्गीय निधीतील सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील कामे करणेकामी र.रु.४.९३ कोटी मात्रच्या आराखड्यास मान्यता देणेकामी **अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

१६. दर सुधार समिती ठराव क्र.०३ दिनांक २०/०९/२०२४ अन्वये केले शिफारशीनुसार सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सार्वजनिक गणेश उत्सव कालावधी करीता कमानी मंडप,स्टेज घालणे व खड्डे काढण्यासाठी परवानगी देताना शुल्क न आकारणी करणेस मान्यता देणेकामी **मुख्यलेखाधिकारी तथा सचिव (दरसुधार समिती) यांचे दि.२०/०९/२०२४ रोजीचा प्रस्ताव.**

१७. दर सुधार समिती ठराव क्र.०४ दिनांक २०/०९/२०२४ अन्वये केले शिफारशीनुसार महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाकडील शुल्कामध्ये वाढ करणेस मान्यता देणेकामी **मुख्यलेखाधिकारी तथा सचिव (दरसुधार समिती) यांचे दि.२०/०९/२०२४ रोजीचा प्रस्ताव.**

१८. दर सुधार समिती ठराव क्र.०२ दिनांक २०/०९/२०२४ अन्वये केले शिफारशीनुसार महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील दंडात्मक शुल्कामध्ये वाढ करणेस मान्यता देणेकामी **मुख्यलेखाधिकारी तथा सचिव (दरसुधार समिती) यांचे दि.२०/०९/२०२४ रोजीचा प्रस्ताव.**

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे आदेशानुसार

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०७/२०२४-२५ दिनांक :- २०/०९/२०२४ चे इतिवृत्त

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण प्रशासक सभा क्र.०८ दि.२०/०९/२०२४ रोजी महानगरपालिका मुख्यालय येथील कै.राजाभाऊ हरिभाऊ जगदाळे सभागृह,सांगली येथे सकाळी १०:३० वाजता आयोजित करणेत आलेली होती. सदर प्रशासक सर्वसाधारण सभेकरीता खालील अधिकारी उपस्थित होते.

अ. क्र.	उपस्थितांची नावे	अ. क्र.	उपस्थितांची नावे
१.	श्री.शुभम गुप्ता – प्रशासक	१४.	श्री.चिदानंद कुरणे – जल./पापु.अभियंता, सां./मि.
२.	श्री.रविकांत आडसुळ – अतिरिक्त आयुक्त,मिरज	१५.	श्री.सहदेव कावडे– सहा.आयुक्त १/ नगरसचिव
३.	श्री.वैभव साबळे – उपायुक्त मुख्यालय	१६.	श्रीमती प्रज्ञा त्रिभुवन – सहा.आयुक्त,प्र.स.क्र.२
४.	श्री.संजय ओहोळ – उपायुक्त मिरज	१७.	श्री.सचिन सागावकर - सहा.आयुक्त,प्र.स.क्र.३
५.	श्रीमती शिल्पा दरेकर – उपायुक्त कर व इतर	१८.	श्री.अनिस मुल्ला- सहा.आयुक्त,प्र.स.क्र.४
६.	श्रीमती विजया यादव - मालमत्ता व्यवस्थापन	१९.	श्री.आप्पा हलकुडे - नगरअभियंता
७.	श्री.पृथ्वीराज चव्हाण –शहर अभियंता	२०.	श्री.अमर चव्हाण – विद्युत अभियंता
८.	श्री.शिरिष धनवे – मुख्य लेखापरिक्षक	२१.	श्री.शंकर भंडारी – ग्रंथपाल
९.	श्री.अभिजीत मेंघडे - मुख्य लेखाधिकारी	२२.	श्री.धनंजय हर्षद-जनसंपर्क/ मालमत्ता अधिक्षक
१०.	श्री.वैभव पाटील – वै.आ.अधिकारी वैद्य.सेवा	२३.	श्री.नकुल जकाते – सिस्टीम मॅनेजर
११.	श्री.वैभव वाघमारे – नगररचनाकार मिरज	२४.	श्री .सुनिल माळी- अग्निशमन अधिकारी
१२.	श्री.अशोक मानकापुरे - प्रशासकीय अधिकारी	२५.	श्री.राजेंद्र काकडे – नगररचनाकार,सांगली
१३.	श्री.विनायक शिंदे – प्रशासन अधिकारी	२६.	श्री.समीर जमादार – विधी विभाग अधिकारी

महापालिका सचिव यांनी सभेच्या सुरुवातीला मा.प्रशासक व सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन, सभेच्या कामकाजास मा.प्रशासक यांच्या आदेशाने सुरुवात केली.

विषय क्र. ०१	मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.०९/०९/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र. ०२	महानगरपालिका क्षेत्रातील श्री.सरस्वती सहकारी भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित,सांगली या संस्थेच्या सि.स.नं.५४८६ व स.नं.२५४/२ या मनपा ओपन स्पेसला शहिद राजगुरु विरंगुळा केंद्र असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणे
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.०३	महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील शामरावनगर कडून उत्तर बाजूने बाहेर येणारा रोड व गंजीखान्याकडून दक्षिणेस बाहेर येणाऱ्या चौकाला आरक्षणाचे जनक छत्रपती राजे राजर्षी शाहू महाराज चौक असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजुर
विषय क्र.०४	महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील व्यंकटेश सृष्टी बायपास रोड अथर्व लक्झरीया या शेजारील परिसरास श्री.छत्रपती शिवाजी महाराज कॉलनी असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.०५	महानगरपालिकेच्या वतीने वडार कॉलनी प्रभाग क्र.१० सांगली येथे बांधण्यात येत असलेल्या वडार भवन या इमारतीस स्वर्गीय अमरदादा निंबाळकर भवन असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.०६	महानगरपालिका क्षेत्रातील उत्कर्ष हडको कॉलनी स.नं.२५२ नविन स.नं.१९/१ या मनपा ओपन स्पेसला उत्कर्ष बालोद्यान असे नामकरण करणेकामी नामकरणाचा प्राथमिक इरादा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजूर

... २ ...

विषय क्र.०७	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.९ स.नं.६३५४/२४५ व ६३५४/२४६ या मनपा ओपन स्पेसला आमदार सुधीर दादा गाडगीळ क्रिडा प्रबोधिनी असे नामकरण करणेकामी नामकरणाचा प्राथमिक इरादा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.०८	सन २०२३-२४ महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात मंजुर एकूण र.रु.१५,००,००,०००/- मात्रच्या प्रस्तावातील काम क्र.५४ , प्रभाग क्र.८ मधील जिजामाता हौसिंग सोसायटी येथील ८० फुटी रोड ते चैत्रबन नाल्यापर्यत रस्ता करणे र.रु.६० लक्ष मात्रच्या कामाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजुरीस्तव सादर करणेस मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.०९	महानगरपालिका क्षेत्रातील विश्रामबाग पोलीस हेडक्वॉर्टर्स व सह्याद्रीनगर भागाकरीता पाणी पुरवठासाठी स्वतंत्र असलेली जूनी कालबाह्य झालेली पी.व्ही.सी.लाईन बदलून यशवंतनगर टाकी ते चैत्रबन चौक लगत हेड क्वॉर्टर्स पाणी योजना संप (साठवण हौद) पर्यत नविन ग्रॅव्हीटी मेन पाईप लाईन टाकणे कामाचा खर्च १५ वित्त आयोगाच्या अनुदानातून करणेस मान्यता देणे.
प्रशासक	१५ वित्त आयोगाच्या निधीतील पाणी पुरवठासाठी अनुज्ञेय असलेल्या निधीच्या खर्चाचा आराखडा सादर करुन, आयुक्तसो यांचे मंजुरीने प्रस्तावित मंजूर निविदा दराप्रमाणे ४४,८२,१५१/- इतका खर्च १५ वा वित्त आयोगाच्या अनुदानातून करणेस मान्यता देणेत येत आहे.
विषय क्र.१०	चालू आर्थिक वर्षात नविन आकारणी होणाऱ्या मालमत्तांच्या बाबतीत मालमत्ताधारकाने सदर देयक एक रकमी भरल्यास मालमत्ताधारकांना सामान्य करात ५% सवलत देणेस मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.११	प्रभावीपणे वसुल होण्याकरीता घरपट्टी देयकामध्ये सवलत देणेस मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.१२	सांगली सि.स.नं.१४१९ व १३९६ या मिळकतीच्या मध्ये असणाऱ्या रेखांकनातील अंतर्गत रस्त्यावर श्री.शामसुंदर तोष्णीवाल यांनी उभ्या केलेल्या गार्डनबाबत प्राप्त हरकतीची सुनावणी अंती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०३ (२) मधील तरतुदीनुसार रस्त्यांतर्गत असलेले ३० फुट X ७० फुट (२१००.०० चौ.फुट) क्षेत्र सार्वजनिक रस्ता असणे बदं करणेस आवयश्यक ती यथोचित कार्यवाही महापालिकेकडून करण्यास मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.१३	राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा सन २०२४-२५ या वर्षात सहभागी होणेस प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजूर, जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज मध्यवर्ती निदान केंद्र, आपत्ती व्यवस्थापन केंद्र आणि घनकचरा व्यवस्थापन या तीन विभागांचा समावेश करणेत यावा.
विषय क्र.१४	सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका व रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आमराई येथे २००KLD क्षमतेचा मलनि:सारण प्रकल्प उभारणेकामी मुदतवाढ व जागा बदलणेस व त्याकामी येणारे र.रु.२४ लक्ष मात्रच्या खर्चास मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.१५	५% मागासवर्गीय निधीतील सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील कामे करणेकामी र.रु.४.९३ कोटी मात्रच्या आराखड्यास मान्यता देणे.
प्रशासक	सदरच्या मंजूर खर्चाचा आराखडा सादर करुन, आयुक्तसो यांचे मान्यतेने पुढील योग्यती कार्यवाही ठेवणेत यावी. विषय मंजूर

... ३...

विषय क्र.१६	दर सुधार समिती ठराव क्र.०३ दिनांक २०/०९/२०२४ अन्वये केले शिफारशीनुसार सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सार्वजनिक गणेश उत्सव कालावधी करीता कमानी मंडप,स्टेज घालणे व खड्डे काढण्यासाठी परवानगी देताना शुल्क न आकारणी करणेस मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.१७	दर सुधार समिती ठराव क्र.०४ दिनांक २०/०९/२०२४ अन्वये केले शिफारशीनुसार महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाकडील शुल्कामध्ये वाढ करणेस मान्यता देणेकामी
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.१८	दर सुधार समिती ठराव क्र.०२ दिनांक २०/०९/२०२४ अन्वये केले शिफारशीनुसार महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील दंडात्मक शुल्कामध्ये वाढ करणेस मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजूर

येणेप्रमाणे सभेचे कामकाज सर्व उपस्थित अधिकारी यांच्या सहमतीने पुर्ण झाल्यानंतर मा.प्रशासक यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

All pages signed

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- २०/०९/२०२४

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०८/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ८५ **दिनांक :-** २०/०९/२०२४

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.०९/०९/२०२४ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.८० ते ठराव क्र.८४ चे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०८/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ८६ **दिनांक :-** २०/०९/२०२४

विषय क्रमांक :- ०२

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील श्री.सरस्वती सहकारी भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित,सांगली या संस्थेच्या सि.स.नं.५४८६ व स.नं.२५४/२ या मनपा ओपन स्पेसला शहिद राजगुरु विरंगुळा केंद्र असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०८/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ८७ **दिनांक :-** २०/०९/२०२४

विषय क्रमांक :- ०३

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील शामरावनगर कडून उत्तर बाजूने बाहेर येणारा रोड व गंजीखान्याकडून दक्षिणेस बाहेर येणाऱ्या चौकाला आरक्षणाचे जनक छत्रपती राजे राजर्षी शाहू महाराज चौक असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधिकारी

महापालिका **सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०८/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ८८ **दिनांक :-** २०/०९/२०२४

विषय क्रमांक :- ०४

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील व्यंकटेश सृष्टी बायपास रोड अथर्व लक्ष्मरीया या शेजारील परिसरास श्री.छत्रपती शिवाजी महाराज कॉलनी असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०८/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ८९ **दिनांक :-** २०/०९/२०२४

विषय क्रमांक :- ०५

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या वतीने वडार कॉलनी प्रभाग क्र.१० सांगली येथे बांधण्यात येत असलेल्या वडार भवन या इमारतीस स्वर्गीय अमरदादा निंबाळकर भवन असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०८/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ९० **दिनांक :-** २०/०९/२०२४

विषय क्रमांक :- ०६

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील उत्कष हडको कॉलनी स.नं.२५२ नविन स.नं.१९/१ या मनपा ओपन स्पेसला उत्कर्ष बालोद्यान असे नामकरण करणेकामी नामकरणाचा प्राथमिक इरादा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता विभाग

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०८/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ९१ **दिनांक :-** २०/०९/२०२४

विषय क्रमांक :- ०७

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.९ स.नं.६३५४/२४५ व ६३५४/२४६ या मनपा ओपन स्पेसला आमदार सुधीर दादा गाडगीळ क्रिडा प्रबोधिनी असे नामकरण करणेकामी नामकरणाचा प्राथमिक इरादा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करुन सात दिवसांच्या अल्प मुदतीत सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०८/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ९२ **दिनांक :-** २०/०९/२०२४

विषय क्रमांक :- ०८

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

महाराष्ट्र शासन नगर विकास शासन निर्णय क्र.मनपा-२०२४/प्र.क्र.४०(१३)/न.वि.१६ (ई-७३१३७१) दि.२९/०२/२०२४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे सन २०२३-२४ महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात मंजुर एकूण र.रु.१५ कोटी मात्र मंजूर झाले असून, सदर कामाची कार्यान्वयन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग असून, शासन निर्णयानुसार शासन अनुदान १००% आहे.

दि.२९/०२/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर ६४ कामांपैकी काम क्र.२८ प्रभाग क्र.१७ कुंटे मळा अंतर्गत ०३ रस्ते विकसीत करणे र.रु.३० लक्ष हे काम महानगरपालिकेकडून मंजूर असल्याने सदरचे काम वगळून उर्वरित काम क्र.५४, प्रभाग क्र.८ मधील जिजामाता हौसिंग सोसायटी येथील ८० फुटी रोड ते चैत्रबन नाल्यापर्यंत रस्ता करणे र.रु.६० लक्ष या कामाचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजुरीस्तव सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०८/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ९३ **दिनांक :-** २०/०९/२०२४

विषय क्रमांक :- ०९

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त मुख्यालय (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग, सांगली कार्यक्षेत्रातील यशवंतनगर टाकी ते चैत्रबन चौक लगत हेड क्वार्टर्स पाणी योजना संप (साठवण हौद) पर्यंतची खुप जुनी १८० एम.एम. व्यासाची पी.व्ही.सी. पाईप (४० वर्षा पुर्वीची) वारंवार लिकेज होत असल्याने आणि ही पाईप खोल व काही ठिकाणी खाजगी जागेच्या लगत आणि गटारी खाली असल्यामुळे ही पाईप लाईन लवकरात लवकर बदलणेसाठी या कामाचा अंदाजित र.रु.४३,१७,८९६/-चा प्रस्ताव शासन अनुदान अगर १५ वे वित्त आयोगाचे प्राप्त अनुदानामधुन रक्कम शिल्लक नसल्यामुळे मनपाच्या मध्यवर्ती निधी मधुन प्रस्तावित करुन त्यास निविदा प्रसिध्दीचे खर्चासह मा.स्थायी समिती ठराव क्र.३७६ दि.२९/०९/२०२२ ने प्रशासकीय मान्यता मिळाले प्रमाणे याकामी जाहिर ई -महाटेंडर पध्दतीने इच्छुक ठेकेदार यांचे कडुन निविदा दर मागवुन या कामी कमी दराचे ठेकेदार श्री.जावेद एस.शेख,मिरज वाटाघाटी अंती एस्टीमेट पेक्षा ३.८०४% जादा (सुधारीत दरसुची दर खर्चाच्या आधारे १.१०४% कमी) दराची निविदा मा.स्थायी समिती प्रशासक ठराव क्र.३० दि.१८/०९/२०२३ ने मंजुर होवुन करारनामा पुर्तता नंतर मंजुर ठेकेदार यांना दि.२७/०२/२०२४ रोजी ६० दिवस मुदतीचा कामाचा आदेश निर्गमित करणेत येवुन त्याप्रमाणे पाईप पुरवठा होवुन कामगिरी प्रगतीत आहे. या कामाचे पाईपच्या पुरवठयानंतर र.रु.२७,९८,७४३/- इतक्या खर्चाचे मध्यवर्ती लेखाशिर्षामध्ये खर्ची टाकुन पहिले रनिंग देयक अदायगीसाठी लेखा विभागाकडे सादर करणेत आले आहे.

उपरोक्त मंजूर ठेकेदार यांचे मनपाच्या आर्थिक स्थितीमुळे देयक अदा होवु शकलेले नाही. कामाची पुढील प्रगती राखुन काम मुदतीत पुर्ण करुन वाहतुकीच्या मुख्य रस्त्यावरील काम तपासणीसह पुर्ण होणे खुप महत्वाचे आहे. यामुळे ठेकेदार यांचेकडुन काम सलग व लवकरात लवकर होणेसाठी पाईपच्या पुरवठयाचे देयक अदा होणेची सतत मागणी होत आहे. वरीलप्रमाणे ठेकेदार यांचे पाईप पुरवठयाचे थकीत देयक अदा झाल्यास चालु प्रशासक काळात पुढील काम मुदतीत करणे शक्य होवुन गैरसोय टळणार आहे.

उपरोक्त प्रलंबित देयक व कामाचा उर्वरित महानगरपालिकेस १५ वे वित्त आयोगातुन प्राप्त झालेल्या अनुदानातुन पाणी व्यवस्थासाठी खर्ची करणेच्या शिल्लक रक्कमेतुन अदा करणेबाबत प्रस्तावित करणेत आलेले आहे. त्यानुसार १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतील पाणी पुरवठासाठी अनुज्ञेय असलेल्या निधीच्या खर्चाचा आराखडा सादर करुन, आयुक्तसो यांची मंजुरी घेणेत यावी. त्यानुसार प्रस्तावित कामाची मंजुर निविदा दराप्रमाणे र.रु.४४,८२,१५१/- इतका खर्च १५ वा वित्त आयोगाच्या अनुदानातुन करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

पाणीपुरवठा अभियंता/मुलेजा

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०८/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ९४ **दिनांक :-** २०/०९/२०२४

विषय क्रमांक :- १०

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता कर व इतर) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहरातील इमारत व जमीनींवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२७, १२८ व १२९ मधील तरतुदीनुसार मालमत्ता कराची आकारणी व वसुली करण्यात येते. तसेच कराधान नियम ३० अन्वये मालमत्ता कर ०१ एप्रिल व ०१ ऑक्टोबर रोजी सुरु होणाऱ्या सहामाही हप्त्याने आगाऊ देय आहे. उक्त अधिनियमतील कलम १४० अ मधील तरतुदीनुसार ०१ एप्रिल रोजी मालमत्ता कर नोंद आकारणी रजिस्टरला नोंद असलेल्या मालमत्तांना मालमत्ता कराचे आर्थिक वर्षाचे दोन्ही सहामाहीचे संपूर्ण बिल रक्कम ३० जुन पूर्वी आगाऊ भरणा केल्यास १०% तर जुलै मध्ये संपूर्ण कर रक्कम भरणाऱ्या मालमत्ता धारकांना ५% सामान्य करात सवलत लागू आहे.

तथापी मालमत्ता कराचे आकारणी रजिस्टरला नोंद नसलेल्या व चालु आर्थिक वर्षात दि.०५ एप्रिल नंतर आकारणी होणाऱ्या नवीन मालमत्तांना प्रथम आकारणी करणेत आलेस अशा मालमत्तांना त्यांची त्यापूर्वीची पूर्वलक्षी आकारणी असल्यास त्यांचे थकबाकीसह चालु आर्थिक वर्षाचे येणे रक्कमेसह मालमत्ता कराची बिले दिली जातात. बिलाची संपूर्ण रक्कम भरण्याकरीता अनुसूचि ड प्रकरण ८ मधील नियम ४१ मधील तरतुदीनुसार बिल मिळाल्यापासुन ९० दिवसाची मुदत असते तद्नंतर दंड आकारणी चालु होते. मात्र सदर मालमत्ताधारकांनी ज्या दिनांकास बिल संगणक प्रणालीतून निर्गत होईल त्या दिनांकापासुन ३ महिन्याच्या आत किंवा ३१ मार्च यापैकी जे अगोदर घडेल त्या दिनांकास मागणी बिलानुसार आगाऊ मालमत्ता कर भरणाऱ्या मालमत्ता धारकांकरीता थकबाकीसह चालु आर्थिक वर्षाचे देयक एक रकमी भरणा केल्यास त्यांनाही चालु आर्थिक वर्षातील मागणीतील सामान्य करात १०% इतकी सवलत देय राहील.

तसेच प्रथमच नवीन आकारणी होणाऱ्या मालमत्तांना त्या ३० जुन पूर्वी आकारणीत आल्यास आणि मालमत्ताधारकांने सदर देयक एक रकमी भरल्यास त्यांनाही सामान्य करात १०% सवलत देय राहील आणि ०१ जुलै ते ३१ जुलै या कालावधीत प्रथमच आकारण्यात येणाऱ्या मालमत्तांच्या बाबतीत मालमत्ताधारकाने सदर देयक एक रकमी भरल्यास सामान्य करात ५% सवलत देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अतिरिक्त - मालमत्ता व कर

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०८/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ९५ **दिनांक :-** २०/०९/२०२४

विषय क्रमांक :- ११

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त मुख्यालय (~~कार्यालय~~ मालमत्ता व कर विभाग) यांचे दि.२२/०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

मा. महासभा ठराव क्र.८८ दिनांक २०/०८/२०२१ अन्वये मालमत्ता कराचे देयक एकरकमी भरणाऱ्या मालमत्ताधारकास बील मिळाल्यापासुन एक महिन्याचे आत संपूर्ण देयक एक रक्कमी भरल्यास चालु देयकात सामान्य करात १०% आणि ३० ते ६० दिवसात भरल्यास ५% सवलत देण्यास मान्यता दिली आहे. तसेच सदर ठरावान्वये ५ पर्यावरण पूरक योजना जसे सौर ऊर्जा वापर, रेन वॉटर हार्वेस्टींग, गांडूळखत, होम कंपोस्टींग व सांडपाण्याचा निचरा या योजनांपैकी किमान ३ योजना राबविल्या असल्यास सामान्य करात ४% सवलत देण्याचे मान्य केले आहे. त्यानुसार अंमलबजावणी सुरु आहे.

तथापी संगणक प्रणालीत एप्रिल पासुन बील जनरेट करता येणे शक्य असल्याने १ एप्रिल ते ३० जुन पर्यंत कराचे देयक (Hard Copy) मिळो न मिळो जे मालमत्ताधारक त्यांचा मालमत्ता कर, मनपाकडे जमा करतील त्यांना ०१ एप्रिल ते ३० जुनपर्यंत सर्व देयक मागणी रक्कमेप्रमाणे एकरकमी भरल्यास चालु देयकातील सामान्य करात १०% सवलत तर दि. १ जुलै ते ३१ जुलै या कालावधीत संपूर्ण देयक एक रक्कमी भरतील त्यांना चालु देयकातील सामान्य करात ५% सवलत देणे अशी दुरुस्ती होणे आवश्यक आहे. जेणे करुन आर्थिक वर्षाचे सुरुवातील संपूर्ण वर्षाचा कर भरणाऱ्या नागरिकांना प्रोत्साहन मिळून जास्तीत जास्त कर मनपाकडे जमा होवू शकेल.

तसेच उक्त नमुद मा. महासभा ठरावात ५ पर्यावरणपूरक योजनापैकी किमान ३ योजना राबविल्यास सामान्य करात ४% सवलत देण्यास मान्यता दिली आहे ही सवलत उक्त १०% व ५% सवलत व्यतिरिक्त आहे. परंतु सदर योजनांतील गांडूळखत व होम कंपोस्टींग या दोन्ही योजना घरातील ओला कचरा व्यवस्थापनाशी निगडीत असल्याने गांडूळखत किंवा होम कंपोस्टींग अशी एकच योजना नमूद करणे आवश्यक वाटते जेणे करुन ५ऐवजी ४ योजनापैकी ३ योजना राबवत असणे आवश्यक राहील.

तसेच सांडपाण्याचा निचरा या ऐवजी सांडपाण्याचा पुनर्वापर असा बदल करणे आवश्यक वाटते म्हणजेच १) सौरऊर्जा वापर (अन्न शिजवणे वॉटर हिटर सौर पॅनेल) २) रेन वॉटर हार्वेस्टींग ३) गांडूळखत किंवा होम कंपोस्टींगव्दारे घरातील ओल्या कचऱ्याचे व्यवस्थापन ४) सांडपाण्याचा पुर्नरवापर या चारपैकी किमान ३ योजना राबविणाऱ्या मालमत्ताधारकास आरोग्य विभागाचा दाखला घेवून ४% सवलत देता येईल. सवलतीकरीता मालमत्ताधारकाने आरोग्य विभागाकडे सदर योजना राबवित असल्याचा अर्ज केल्यानंतर संबंधीत स्वच्छता निरिक्षक (SI) यांनी तपासणी करुन किमान ३ योजना कार्यान्वित असलेबाबत प्रमाणित करणे व त्याबाबतचे Geo Tag Photo यासह दाखला दिल्यानंतर सदर सवलत देय करता येईल.

तसेच मा.महासभा ठराव क्र.८९ दिनांक २०/०८/२०२१ अन्वये माझी वसुंधरा अभियानातर्गत नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत व पर्यावरण संरक्षणबाबत प्रबोधन व जनजागृती होण्याकामी मनपा कार्यक्षेत्रात पंचतारांकित घरांना मा.महासभा ठराव क.८६ दि.२०/०१/२०२१ अन्वये सामान्य करात ४% सवलत देण्याची योजना राबविणेसाठी पुढील कालावधीसाठी मुदतवाढ दिली आहे यास्तव पर्यावरण पुरक कामगिरी करणा-या पंचतारांकीत घरांना चालू वर्षाच्या सामान्य करात ४% सवलत देय होईल. यासाठी आरोग्य विभागाने प्रत्यक्षात जागेवर जाऊन सदर योजना कार्यान्वित असलेबाबत जिओ टॅग फोटोसह प्रमाणित करुन, दिलेल्या दाखल्याच्या आधारे सवलत देय होईल.

उपरोक्त प्रस्तावा प्रमाणे दि.०१ एप्रिल ते ३० जून पर्यत सर्व देयक मागणी रक्कमेप्रमाणे एकरक्कमी भरलेस चालू देयकातील सामान्य करात १०%, तसेच ०१ जुलै ते ३१ जुलै या कालावधीत संपुर्ण देयक भरलेस चालू देयकातील सामान्य करात ५%, आणि या व्यतिरिक्त उपरोक्त नमुद पंचतारांकित घरांना आणि उपरोक्त ४ पैकी किमान ३ योजना राबविणाऱ्या मिळकर्तीना चालू वर्षाच्या सामान्य करात ४% सवलत देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता व कर
महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०८/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ९६ **दिनांक :-** २०/०९/२०२४

विषय क्रमांक :- १२

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त मुख्यालय (नगररचना विभाग) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

सांगली सिसनं. १४१९ लाले प्लॉट या मिळकतीमध्ये बालाजी मंदिरस्थित आहे. सिसनं. १४१९ व १३९६ या मिळकतीमधील असणाऱ्या रेखांकनातील अंतर्गत रस्त्यावर श्री.शामसुंदर तोष्णीवाल यांनी ३० फुट x ७० फुट या मापाचे गार्डन सुरू केले असून सदरचे अतिक्रमण काढून टाकण्याबाबत श्री. राजीव लाले यांनी महानगरपालिकेकडे लेखी तक्रार अर्ज केले होते. रेखांकनामध्ये इतर पर्यायी रस्ते उपलब्ध असल्याने सदरचा रस्ता कायमस्वरूपी बंद करून गार्डन तसेच ठेवण्याबाबतचे पत्र श्री. तोष्णीवाल यांनी दिले होते. उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २०३ (2) अन्वये सिसनं. १४१९ व १३९६ मधील रेखांकनातील ३० फुटी रूंदीचा रस्ता रद्द करण्यासाठीची जाहीर नोटीस लावून नोटीस दिनाकांपासून ३० दिवसाच्या आत नागरिकांच्या सूचना व हरकती मागविण्यात याव्यात अशी जाहीर नोटीस दि. १०.०६.२०२२ रोजी जा.क्र. मनपा/टीपी/७/९/जन/२७९/२२-२३ देणेत आली होती. सदर जाहीर नोटीसीच्या अनुषंगाने एकूण २७८ सूचना व हरकती प्राप्त झालेल्या आहेत. सदरचा रस्ता खुला ठेवणे व कायमस्वरूपी रद्द करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०३ (२) अन्वये वरील प्राप्त हरकतीबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणेकामी दि.१८.०९.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीस एकूण ७६ नागरिकांनी उपस्थिती लावलेली होती.

प्रस्तुत प्रकरणी प्राप्त हरकती सूचना इत्यादी बाबीचे अवलोकन केले असता सि.स.नं. १४१९ व १३९६ यांना पश्चिमेस रस्ते उपलब्ध असून सि.स.नं.१४१९ च्या मागील सि.स.नं.१४२० व सि.स.नं.१३९६ च्या मागील सि.स.नं.१३९५ यांना अनुक्रमे उत्तरेस व दक्षिणेस ३० फुटी रस्ता तसेच मुख्य रस्त्यास येण्यास उत्तर दक्षिण २० फुटी रस्ता उपलब्ध होत आहे. तसेच सिसनं.१४२१,१४२२,१४२३ यांना पुर्वेकडील मुख्य रस्त्यास जाण्यासाठी पुर्व पश्चिम चालीचा ३० फुटी रस्ता व पश्चिमेस जाण्यास दक्षिण उत्तर चालीचा २० फुटी व पुर्व पश्चिम चालीचा ३० फुटी रस्ता उपलब्ध होत आहे. त्यामुळे सर्व भूखंडधारकांना पर्यायी रस्ते दिसून येतात. कोणतेही भूखंड हे लँड लॉक म्हणजे जमीनबंद होत नाही. जागेवर असलेले गार्डन परिसरातील सर्वांना खुले ठेवणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०३ (२) नुसार महानगरपालिकेच्या मंजूरीने विहित असलेला कोणताही भाग कायमचा बंद करण्यात येईल, या तरतूदीनुसार आवश्यक ती यथोचित कार्यवाही महानगरपालिकेकडून करणेत आलेली आहे. सबब, सदर रस्त्यातंर्गत असलेले ३० फुट x ७० फुट (२१००.०० चौ.फुट) क्षेत्र सार्वजनिक रस्ता असणे बंद करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सह. संचालक - नगररचना

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०८/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ९७ **दिनांक :- २०/०९/२०२४**

विषय क्रमांक :- १३

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारान्वये,

सोबतचे उपायुक्त कर व इतर (मध्यवर्ती निदान केंद्र) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियानांतर्गत सर्व स्तरावर अभियान व स्पर्धा -२०२४-२५ राबविण्याबाबत क्रमांक रागांअ ११२४ /प्र.क.२८/र.व.का.२ दि.२९/०७/२०२४ रोजी रोजीच्या पत्राने राज्यातील राज्य, जिल्हा, तालुका, इ. स्तरावर कार्यवाही करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

त्यानुसार नाविन्यपूर्ण व पथदर्शी स्वरुपाच्या संकल्पना/प्रयोग/ उपक्रम या प्रकारात सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज मध्यवर्ती निदान केंद्र, आपली व्यवस्थापन केंद्र आणि घनकचरा व्यवस्थापन या तीन विभागांनी सहभागी होऊन स्पर्धेच्या नियमांची परिपूर्ती करु शकतात.

जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज मध्यवर्ती निदान केंद्र

१. जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज मध्यवर्ती निदान केंद्राची स्थापना हि सर्वसामान्य गरजू व गरीब नागरिक हे महागडया आरोग्य सेवापासून वंचित राहू नयेत या उद्देशाने सन २०२१ साली करण्यात आली.

२. याकरीता रुग्णांना मध्यवर्ती निदान केंद्रामार्फत अल्पदरात व महालॅब मार्फत मोफत रक्त चाचण्या, एक्स-रे व ईसीजी ई.ची तपासण्या करण्यात येतात. तसेच त्याचे अहवाल वेळेत देणेत येतात. तसेच त्यांच्या नोंदी अद्यावत ठेवण्याकरीता CLOUD APP हि संगणकीय प्रणाली वापरली आहे. त्यावरुन रुग्णांचे चाचणी अहवाल सुरक्षित ठेवले जातात. तसेच गरिबातील गरिब रुग्णांनाही रक्त चाचण्या व त्याचे परिपूर्ण अहवाल यामुळे रुग्णांना वेळेत उपचार मिळत आहेत. याचा मुखोद्गत प्रचार व प्रसार दिवसेंदिवस वाढतच आहे.

३. गेल्या ३ वर्षात या नाविन्या पूर्ण योजने नागरिकांच्याकडून चांगला प्रतिसाद मिळत असून, महापालिकेच्या वतीनेही आधुनिक लॅब मशिन व एक्स-रे मशिन पुरविण्यात आले आहेत. त्यामुळे इतर शासकिय यंत्रणावरील भार कमी झाला असून नागरिकांनाही खाजगी लॅब पेक्षा अत्यंत कमी दरात आरोग्य सेवा उपलब्ध झाल्या असल्याने त्यांचा आर्थिक फायदा झालेला आहे. जसे की, आपण खाजगी दराशी तुलना केली असता त्यांची निश्चित रक्कम सांगता येते.

४. असा उपक्रम किंवा योजना तालुका स्तरावर, महापालिकास्तरावर, प्रभागस्तरावर किंवा ज्या ठिकाणी या सुविधा उपलब्ध नाहित त्या ठिकाणी उपलब्ध तज्ञांच्या सहाय्याने किंवा तेथील तज्ञांना नेमणूक देवून अल्प जागेत सुरु करणे सहज शक्य आहे.

जसे, १) आरोग्याच्या सोयी उपलब्धच नाहित अशा ठिकाणी, २) अतिशय दुर्गम भागात /मागास भागात ज्या ठिकाणी डॉक्टर आहेत परंतू ते अशा चाचण्याशिवाय निश्चित उपचार करु शकत नाहीत. ३) ज्या ठिकाणी वांरवार साथीचे रोग पसरतात अशा भागात असे निदान केंद्र उभे करता येऊ शकते.

५. अल्पदरात असल्याने नागरिकांना त्यांचा थेट फायदा मिळतो. तसेच शासनाशी संबंधित संगणक प्रणालीमधून, रुग्णांची संगणकावर नोंदणी केली असता त्यांचे चाचणी अहवाल आयुष्यमान भारत सारख्या योजनांशी संलग्नित ठेऊन, सुरक्षित ठेवले जाणे सहज शक्य आहे.

६. जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज मध्यवर्ती निदान केंद्र हे याबाबतचे अत्यंत बोलके उदाहरण असून याची दखल घेऊन मा.विभागीय आयुक्त पुणे यांनी या केंद्रास सदिच्छा भेट दिली आहे.

आपत्ती व्यवस्थापन केंद्र

१. डिजीटल लॉक सुविधेसह सुरक्षित भव्य प्रवेशद्वार
२. स्वागत कक्ष (रिसेप्शन)
३. वॉर रुम मध्ये डिजीटल स्क्रीन, वायरलेस संदेशवहन सुविधा (वॉकी-टाकी) इंटरनेट सुविधा,रडार मॉनिटरींग स्टेशन, जी.पी.एस.वाहन मॉनिटरींग सुविधा,आपत्ती मित्र ॲप सुविधा, २४X७ टोल फ्री क्रमांकावर तक्रार नोंरणी व निवारणाची सोय.
४. मनपा क्षेत्रात मनपाने विविध १५ ठिकाणी बसविलेल्या १६ सी.सी.टी.व्ही.कॅमेरे व पोलिस विभागाकडून बसविलेल्या ७ ठिकाणचे १६ सी.सी.टी.व्ही.कॅमेराद्वारे निरिक्षण
५. सी.सी.टि.व्ही.कॅमेरा निरिक्षणाद्वारे लॉर्ड आयर्विन पुल,सांगली व कृष्णाघाट मिरज पुला जवळील पाण्याचे पातळीची माहिती नागरीकांना प्रत्येक तासाला आपत्ती मित्र ॲपद्वारे देणेची सुविधा
६. महापूर अनुषंगिक ३० फुट ते ६१ फुटापर्यतचे पाणी पातळीने बाधीत होणारे (व्यापणारे) क्षेत्राचा ड्रोन सर्व्हे
७. सर्व शासकीय कार्यालयांना वेळोवेळी पाठवावयाचे माहितीसाठी अद्यावत संगणक प्रणाली व प्रिंटींगची सोय
८. आपत्ती व्यवस्थापन विषयक पदाधिकारी / अधिकारी / कर्मचारी /एन.जी.ओ. यांना प्रशिक्षणासाठी प्रोजेक्टर स्क्रिन,साऊंड सिस्टिम,संगणक व्यवस्थेसह वातानुकुलीत ४० सिटस् चे दालन (ट्रेनिंग सेंटर)
९. निर्णय अधिकारी / कर्मचारी /संगणक चालक यांचे बैठक व्यवस्थे करीता संगणक प्रणालीसह स्वतंत्र दालन
१०. पदाधिकारी / अधिकारी / नागरिकांचे / कार्यालयीन कामकाज अनुषंगिक भेटी करीता आयुक्त कक्ष
११. कार्यालयास २४X७ विद्युत पुरवठ्यासाठी अत्यावश्यक क्षमतेने जनरेटरची सुविधा
१२. संगणकीय यंत्रणा सुरक्षिततेसाठी वातानुकुलीत यंत्रणा व त्यासाठी अनुषंगिक यु.पी.एस.व सर्व्हर रुमची स्वतंत्र व्यवस्था
१३. चहा / पाणी व्यवस्थेकरीता अद्यावत किचन रुम (पॅन्ट्री) ची सोय
१४. पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छता गृहाची सोय.

घनकचरा व्यवस्थापन

१. महानगरपालिका मालकीचा गट नं. १२७, १२८ एकुण ३२ एकर जागेमध्ये समडोळी रोड कचरा डेपोमध्ये अंदाजित ६,६५,२८४ क्युबीक मीटर व गट नं. १२१ ते १३२ एकुण ५२ एकर जागेमध्ये मिरज-बेडग रोड कचरा डेपोमध्ये अंदाजित ३,१३,८२१ क्युबीक मीटर असे एकूण ९,७९,१०५ क्यूबीक मीटर इतका जुना साठलेला कचरा होता.
२. घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २००० व २०१६ अंतर्गत समडोळी रोड व मिरज बेडग रोड कचरा डेपोमधील (१) जुन्या साठलेल्या कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने बायोमायनिंगव्दारे प्रक्रिया करुन कचऱ्याची विल्हेवाट लावणे र.रु.३६ कोटी आणि (२) दैनंदिन येणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता प्रकल्प उभारणी करणे व प्रक्रिया करुन कचऱ्याची विल्हेवाट लावणेकरीता एजन्सी नियुक्तीकरीता र.रु.४३ कोटी असे दोन स्वतंत्र निविदा महा ई-निविदेव्दारे दि.२४/०१/२०२३ रोजी प्रसिध्दी देऊन एजन्सी नियुक्त करण्यात आलेली आहे.
३. या निविदेमध्ये मे. कृष्णा ग्रीन एनव्हायरोन सोल्युशन,पुणे या नियुक्त एजन्सीला दि.१७/०४/२०२३ रोजी जुन्या साठलेल्या कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने बायोमायनिंगव्दारे प्रक्रिया करुन कचऱ्याची विल्हेवाट लावणेचा प्रकल्प सुरू करणेकामी वर्क ऑर्डर देण्यात आली आहे. तसेच दैनंदिन कचऱ्यावर प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणे प्रकल्प उभारणीची वर्क ऑर्डर दि.२९/०५/२०२३ रोजी देण्यात आलेली आहे.
४. त्यानुसार नियुक्त एजन्सीने दि. २४ मे २०२३ रोजी कामगिरी सुरू करुन मिरज-बेडग रोड कचरा डेपोमधील ३,१३,८२१ क्युबीक मीटर कचऱ्यावर दि.१० सप्टेंबर २०२३ अखेरपर्यत व समडोळी रोड कचरा डेपोमध्ये दि.१९ मे २०२३ रोजी कामगिरी सुरू करुन ६,६५,२८४ क्यूबीक मीटर जुन्या कचऱ्यावर दि. १० जानेवारी २०२४ अखेरपर्यत बायोमायनिंगव्दारे प्रक्रिया करुन विल्हेवाट लावून १०० %जागा रिकामी करण्यात आलेली आहे. साधारणत: एका वर्षाच्या आत सर्व जुना साठलेला कचरा बायोमायनिंग प्रक्रियेव्दारे विल्हेवाट लावण्यात आलेला आहे.

५. मिरज-बेडग रोड कचरा डेपोमध्ये रिकामी करण्यात आलेल्या जागेमध्ये दैनंदिन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठीचा प्रकल्प उभारणीची कामगिरी पुर्ण केलेली आहे. सदरचा प्रकल्प दि. ०४ डिसेंबर २०२३ रोजी सुरू करण्यात आलेला आहे. या कचरा डेपोमध्ये दैनंदिन ६० ते ७० मेट्रीक टन कचरा येतो. उक्त कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता विड्रों कंपोस्टींग ५० TPD, मटेरिअल रिकव्हरी फसिलिटी १०० TPD आणि सायन्टीफीक सॅनेटरी लॅडफिल उभारण्यात आली आहे. सदर प्रकल्पाची एकुण क्षमता १५० TPD प्रतिदिन इतकी आहे. सद्यस्थितीमध्ये मिरज बेडग रोड कचरा डेपोमध्ये दैनंदिन ६० ते ७० TPD कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे.

६. समडोळी रोड कचरा डेपोमध्ये रिकामी करण्यात आलेल्या जागेमध्ये दैनंदिन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठीचा प्रकल्प उभारण्यात आला असून दि.१७/०६/२०२४ रोजी प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. या कचरा डपोमध्ये दैनंदिन १४० ते १५० मेट्रीक टन कचरा येतो. उक्त प्रकल्पामध्ये बायोमिथनाझेशन (१० TPD) प्रकल्प क्षमता, विड्रों कंपोस्टींग १०० TPD, मटेरिअल रिकव्हरी फसिलिटी (१०० टन) क्षमता आहे. सदर प्रकल्पाची एकुण क्षमता २१० TPD इतकी आहे. समडोळी रोड कचरा डेपोमध्ये दैनंदिन १४० ते १५० TPD कच-या वर प्रक्रिया केली जाते.

७. सद्यस्थितीमध्ये दि. १८ जुलै २०२४ अखेरपर्यत मिरज बेडग रोड कचरा डेपोमधील १०००८.०६ टन व समडोळी रोड कचरा डेपोमधील ३६४०.११५ टन दैनंदिन येणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात आलेली आहे.

८. तसेच, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका व सह्याद्री देवराई या सामाजिक संस्थेमार्फत बेडग रोड कचरा डेपोमध्ये वृक्षारोपण करुन उद्यान विकसित करण्यात आले आहे. भविष्यात बेडग रोड कचरा डेपो पर्यटन स्थळ म्हणुन विकसित करणेबाबत महानगरपालिकेचा मानस आहे.

उपरोक्त प्रमाणे तिन्ही विभागांचे प्रस्ताव विभागीय किंवा राज्यस्तरावर सहभागी होणेसाठी पाठविणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अधिक. मध्यवर्ती निदान केंद्र.
सह. आयुक्त - आपली व्यवस्थापन केंद्र.
पर्यावरण अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०८/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ९८ **दिनांक :-** २०/०९/२०२४

विषय क्रमांक :- १४

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे अतिरिक्त आयुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका व रोटरी क्लब, सांगली यांच्या विद्यमाने आमराई उद्याना येथे २०० KLD मलनि:सारण (STP) प्रकल्प उभारण्या करणे कामी बांधकाम व्यवस्था करिता अंदाजे र.रु.२४ लक्ष इतक्या येणाऱ्या खर्चास मा.आयुक्तसो मंजूरी आदेश क्र.१५१/२०२३-२४ दि.२५/०७/२०२३ अन्वये प्राप्त निविदेमधील सर्वात कमी दराचे मक्तेदार श्री.कुमार भालचंद्र आपटे यांना दि.२४/११/२०२३ ने जलनि:सारण विभागाकडून वर्क ऑर्डर देणेत आली आहे.

सबब, उपरोक्त कामगिरी संबंधी आमराईमध्ये सदर प्रकल्प उभा करणेस बऱ्याच संस्था, पक्ष, संघटना व परिसरातील नागरिकांचेकडून विरोध होत असल्याने सदरचा प्रकल्प महानगरपालिकेचे होत असलेले वारणाली रुग्णालया शेजारील जागेमध्ये सदरचा म्हणजेच २०० KLD क्षमतेचा मलनि:सारण प्रकल्प उभारणी करणे व संबंधीत कामाची मुदत ४५ दिवस होती ती संपलेली असल्याने व जागा बदल झालेने सदर कामास मुदतवाढ देणे आवश्यक असल्याने, सदर कामास मुदतवाढ देणेस व जागा बदलणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सदरचा खर्च सन २०२४-२५ चे अर्थसंकल्पी "E-१०११) नविन जलनि:सारण पाईप लाईन टाकणे, सांगली" या लेखाशिर्षामधून होण्याचा आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

जलनि:सारण अधिक्षक

महापालिका **सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०८/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ९९ **दिनांक :- २०/०९/२०२४**

विषय क्रमांक :- १५

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामे ५% मागसवर्गीय निधीतून प्रस्तावित करणेत आलेली आहेत. सदर विकास कामांना प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सदर कामांच्या र.रु.४.९३ कोटी मात्रच्या खर्चास ही सभा मान्यता देत असून, सदरच्या मंजूर खर्चाचा आराखडा सादर करुन, आयुक्तसो यांचे मान्यतेने पुढील योग्यती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०८/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १०० **दिनांक :- २०/०९/२०२४**

विषय क्रमांक :- १६

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे मुख्यलेखाधिकारी तथा सचिव, दरसुधार समिती ठराव क्र.०३ दि.२०/०९/२०२४ रोजीचा ठराव अवलोकनी घेणेत आला.

महानगरपालिकेच्या दर सुधार समिती अंतर्गत मा.ना.सुरेशभाऊ खाडे पालकमंत्री सांगली जिल्हा यांचे दि ४/९/२०२४ रोजीचे पत्रानुसार मनपा कार्यक्षेत्रामध्ये गणेशोत्सवासाठी कमानी मंडप, स्टेज घालणे व खडडे काढण्यासाठी परवानगी देताना शुल्क आकारणी न करणेसाठी मा.आयुकत तथा प्रशासक यांना कळविणेत आले होते. त्याअनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदय यांचे दि १४/८/२०२४ व्ही सी मधील झालेल्या सुचनेनुसार व मा. ना. सुरेशभाऊ खाडे पालकमंत्री सांगली जिल्हा यांचे पत्रानुसार व अतिरिक्त आयुक्तसो यांचे शिफारसी नुसार सन २०२४-२५ सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सार्वजनिक गणेश उत्सव कालावधी करीता कमानी मंडप, स्टेज घालणे व खडडे काढण्यासाठी परवानगी देताना शुल्क आकारणी न करणेस दर सुधार समिती ठराव क्र.०३ दि.२०/०९/२०२४ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार सन २०२४-२५ सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सार्वजनिक गणेश उत्सव कालावधी करीता कमानी मंडप, स्टेज घालणे व खड्डे काढण्यासाठी परवानगी देताना शुल्क आकारणी न करणेस दरसुधार समितीच्या शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुख्यलेखाधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०८/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १०१ **दिनांक :-** २०/०९/२०२४

विषय क्रमांक :- १७

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे मुख्यलेखाधिकारी तथा सचिव, दरसुधार समिती ठराव क्र.०४ दि.२०/०९/२०२४ रोजीचा ठराव अवलोकनी घेणेत आला.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकाच्या मालमत्ताचे काम कर विभागामार्फत करण्यात येत आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये खालील प्रमाणे नमुद केले नुसार कर विभागाच्या शुल्कामध्ये वाढ केलेस महानगपालिकेच्या उत्पन्नात भरीव वाढ होणार असल्याने, खालीलप्रमाणे दरवाढ करणेस दरसुधार समिती ठराव क्र.०४ दि.२०/०९/२०२४ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे.

अ. नं.	शुल्क / कराचे नाव	सध्याचे दर	महासभा ठराव क्रं	प्रस्तावित शुल्क्
१	मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र	२००/-	महासभा ठराव क्रं-४५ दि १०/१०/२००८	खरेदीपत्राने हस्तांतर १०००/- वारस हस्तांतर ५००/-
२	असेसमेंट उतारा	५०/-	महासभा ठराव क्रं-४५ दि १०/१०/२००८	एका प्रतीस १००/-
३	डिक्लेरेशन फॉर्म	५०/-	महासभा ठराव क्रं-४५ दि १०/१०/२००८	एका प्रतीस १००/
४	घरपटटी थकबाकी नसले बाबतचा दाखला	५०/-	महासभा ठराव क्रं-४५ दि १०/१०/२००८	एका प्रतीस १००/

उपरोक्त प्रमाणे दर सुधार समितीने मान्यता दिलेनुसार महानगरपालिका उत्पन्नामध्ये वाढ होणार असलेने, दरसुधार समितीच्या शिफारशीनुसार कर विभागाकडील शुल्कामध्ये वाढ करणेस ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

शुल्क / अतिरिक्त - मालमत्ता कर

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०८/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १०२ **दिनांक** :- २०/०९/२०२४

विषय क्रमांक :- १८

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे मुख्यलेखाधिकारी तथा सचिव, दरसुधार समिती ठराव क्र.०४ दि.२०/०९/२०२४ रोजीचा ठराव अवलोकनी घेणेत आला.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या पाणर पुरवठा विभागाकडून मनपा क्षेत्रात गॅस पाईप टाकणे,गटार बांधकाम,नाले सफाई तसेच, ऑप्टीकल केबल टाकणे व विविध कामासाठी खुदाई मुळे पाणी पुरवठ्याच्या पाईप लाईन लिकेज होता संबंधीत ठेकेदार यांचेकडून दंड वसुल करणेकामी प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार खालीलप्रमाणे दरवाढ करणेस दरसुधार समिती ठराव क्र.०२ दि.२०/०९/२०२४ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे.

अ. नं.	वितरण व्यवस्था	व्यास	खुदाई पाणी उपसा दुरुस्ती व तपासणी नंतर भराई पोटी दंड आकारणी रक्कम	लिकेज दुरुस्तीसाठी वापरणेत येणारे साहित्याची रक्कम	शेरा
१	एच.डी.पी.ई/पी.व्ही.सी पाईप	९० एम.एम.ते २०० एम.एम.	२०,०००/-	प्रत्यक्ष लिकेज दुरुस्ती साठी लागणारी इतर आवश्यक साहित्य	संबंधीत ठेकेदार अगर कंपनी यांनी दुरुस्तीचे साहित्य न दिल्यास त्याची बाजार दराने अतिरिक्त रक्कम वसुलात आणणे आवश्यक
२	डी.आय./सी.आय./ ए.सी. पाईप	६ इंची ते १६ इंची (२०० एम.एम. ते ४०० एम.एम.)	३०,०००/-	प्रत्यक्ष लिकेज दुरुस्ती साठी लागणारी पाईप मटेरिअल जाईट लॅम्प व इतर	
३	डी.आय./सी.आय./ ए.सी.पाईप	१६ इंची ते ३२ इंची (४०० एम.एम. ते ८०० एम.एम.)	५०,०००/-	प्रत्यक्ष लिकेज दुरुस्ती साठी लागणारी पाईप मटेरिअल जाईट लॅम्प व इतर	

उपरोक्त प्रमाणे दर सुधार समितीने मान्यता दिलेनुसार महानगरपालिका उत्पन्नामध्ये वाढ होणार असलेने, दरसुधार समितीच्या शिफारशीनुसार पाणी पुरवठा विभागाकडील दंडात्मक शुल्कामध्ये वाढ करणेस ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका